
# संतांच्या श्रेष्ठ कथा

## भाग १

सुमेधा कुलकर्णी



परी प्रकाशन

संतांच्या श्रेष्ठ कथा
भाग १

◆ ———————

© सुरक्षित

◆ ———————

प्रकाशक :
परी प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ———————

प्रमुख वितरक
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

मुखपृष्ठ :
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ———————

मुद्रक :
जयंत प्रिंटरी

◆ ———————

आवृत्ती :
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ———————

किंमत :
रुपये १२०/-

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | संत नामदेव | ३ |
| २. | संत एकनाथ | २० |
| ३. | संत तुकाराम | ३७ |
| ४. | संत ज्ञानेश्वर | ५४ |
| ५. | संत गोरा कुंभार | ७१ |
| ६. | संत रामदास | ८७ |
| ७. | संत सावता माळी | १०४ |
| ८. | संत साईबाबा | १२१ |
| ९. | संत गाडगेबाबा | १३७ |
| १०. | संत गजानन महाराज | १५३ |



# संत नामदेव

परभणी जिल्ह्यातील नरसी–ब्रह्मणी या छोट्याशा गावात दामाशेटी आणि गोणाई नामक एक जोडपे राहात होते. ती शिंपी कुळातील असून कापड विक्रीचा त्यांचा व्यवसाय होता. त्यांच्या घरात पंढरीची वारी होती. दामाशेटी–गोणाई हे नवरा–बायको स्वभावाने गरीब, धार्मिक, मनमिळाऊ असे होते. आपण बरे नि आपले काम बरे असा त्यांचा स्वभाव होता. घरात वारी असल्यामुळे इतर वारकऱ्यांशी त्यांच्या चांगल्या ओळखी होत्या. अशाच ओळखीने ते पंढरीस वारीस जात. विठ्ठलाचे दर्शन घेत. घटकाभर विश्रांती घेत. भाकर तुकडा खाऊन माघारी येत. वारी पायीच होत असे. त्यामुळे वाटेत पुष्कळ वारकरी भेटत. अशाच ओळखीतून दामाशेटी–गोणाई पंढरीस राहावयास आले– अगदी कायमचे. पंढरपुरास राहावयास आल्यापासून त्यांचा व्यापार फायद्यात येऊ लागला. दामाशेटी धर्मकार्य जाणणारे होते. सज्जन होते. पापभीरू होते. कुणाच्याही वाळल्या पाचोळ्यावर पाय देणारे नव्हते. ते देवभक्त असल्यामुळे रोज पंढरीनाथास नेवैद्य दिल्याशिवाय अन्न खात नसत. पंढरीनाथाच्या दर्शनाच्या निमित्ताने वारकरी घरी येत असत. त्यामुळे विचारांची देवाणघेवाण होत असे. अनेक विषयांवर चर्चा होत असत. एकमेकांची सुख–दु:खे जाणून घेतली जायची. घरी कीर्तन, भजन असायचे. दामाशेटी–गोणाईस आऊबाई नावाची लेक होती. मुलगा व्हावा म्हणून गोणाईने देवास नवस बोलला होता. पुढे काही दिवसांनी गोणाईला मुलगा झाला. त्याचे नाव 'नामदेव' असे ठेवले. या नामदेवाच्या जन्माबाबत आणखी एक आख्यायिका सांगितली जाते. गोणाईस देवाने एक शिंपला दिला होता. तो शिंपला नऊ महिन्यांनी आपोआप उघडेल असे सांगितले होते आणि नऊ महिने होताच तो शिंपला उघडला. त्यात बालक होते. ते बालक म्हणजेच नामदेव होय. नामदेवांचा जन्म कार्तिक शुद्ध एकादशी शके ११९२ मध्ये झाला.

वारकरी संप्रदायाचे बाळकडू नामदेवास आईच्या पोटात आल्यापासूनच मिळाले होते. त्यामुळे उपजतच त्याला विठ्ठलभक्तीची गोडी उत्पन्न झाली होती. हरीनामाची आवड

त्याच्यामध्ये दिसून येत होती. नामदेव नवसाचा पुत्र होता. गोणाईने त्यास लाडात वाढवले होते. त्यामुळे तो थोडासा हूड होता. हट्टी होता. हा नामदेव पाच वर्षांचा झाला. तेव्हा देवळात जाऊन पंढरीनाथास नेवैद्य दाखवण्याचे काम दामाशेटींनी नामदेवास सांगितले. लंगोटी लावलेला नामदेव नेवैद्य घेऊन राऊळात गेला. पंढरीनाथास नेवैद्य दाखवला आणि तो नेवैद्य तूच खा म्हणून त्याने त्या विटेवरील विठोबास निक्षून सांगितले. तो दगडाचा देव कसा काय नेवैद्य खाईल? लहानग्या नामदेवास याचे वाईट वाटले. तो देवास म्हणाला, ''अरे देवा ! तू जर हा नेवैद्य खाल्ला नाहीस तर बघ. मला वाईट वाटेल. मी मला कोणतीही शिक्षा करून घेईन. तुझ्या पायावर डोके आपटून प्राण देईन. बोल, नैवेद्य खाणार का मी जीव देऊ? अशा धमकीमुळे पंढरीनाथ घाबरला. त्याने मुकाट्याने ती नैवेद्याची वाटी तोंडाला लावली. नैवेद्य खाल्ला. देवाने नेवैद्य संपवला हे बघून नामदेव आनंदून गेला. नैवेद्याचे रिकामे भांडे घेऊन नामदेव आनंदात घरी गेला.

नैवेद्याचे रिकामे भांडे बघून गोणाई नामदेवास म्हणाली, 'बाळा, यातील नैवेद्य कुठे आहे ?' नामदेवाने सांगितले, 'नैवेद्य देवाने खाल्ला.' पण गोणाईस ते खरे वाटेना. तिने पुन्हा पुन्हा नामदेवाला विचारले; पण बाल नामदेवाने तेच तेच उत्तर दिले. त्यामुळे गोणाई गोंधळून गेली. तिला नवलही वाटले. तिने ही गोष्ट आपल्या पतीस दामाशेटींना सांगितली. दुसरे दिवशी त्यांनी नामदेवाला नैवेद्य देऊन देवळात पाठवले आणि त्याच्या नकळत ते लपून छपून देवळात गेले. आजही देवाने नामदेवाच्या हट्टाखातर नैवेद्य खाल्ला. संपवला. ते बघून दामाशेटींना आश्चर्य वाटले. आनंदाश्रूंनी त्यांचे डोळे भरले. नामदेवाच्या कौतुकाने त्यांचे मन भरून आले. आपला नामदेव नक्कीच पुढे मोठा भगवद्‌भक्त होणार असे त्यांना वाटले. त्यांनी नामदेवास बरोबर घेतले. पंढरीनाथास हात जोडले आणि नामदेवाला घेऊन ते घरी आले. देवळात घडलेली हकीकत त्यांनी गोणाईस नामदेवाच्या आईस सांगितली. तिलाही आपल्या पुत्राबद्दल अभिमान वाटला. अशाच लाडात नामदेव लहानाचा मोठा होऊ लागला.

दामाशेटी रोज त्यास लिहिण्या-वाचण्यास शिकवित असत. नामदेव जात्याच हुशार बुद्धीचा होता. त्यामुळे तो लिहायला वाचायला लवकरच शिकला. मुलगा असल्यामुळे तो खोडकरही होता. खेळायला मुलांमध्ये तो जात असे. मारामाऱ्या, चेष्टा करणे यासारखे प्रकार तो करीत असे. चेंडू, लगोरी, आट्यापाट्या, हुतूतू यासारखे खेळही तो खेळत असे. घरी वारकरी ये-जा करीत. त्यांच्यातही मिसळत असे; पण घरचा कापड व्यवसायाचा धंदा मात्र तो मनापासून करत नसे. तू धंदा कर. तुझ्या पोटापाण्याचे बघ. आमच्या माघारी तुला कोण सांभाळणार ? तुझे तुलाच बघायला हवे, असे त्यास आईवडील नेहमी सांगत. सारखेच

पाठीशी लागले की थोडेफार काम करीत असे. आता त्याला नवीनच छंद लागला होता. तो म्हणजे पंढरीनाथाच्या देवळात बसायचे. चांगले दिवस दिवस बसायचे. त्या विटेवरच्या विठ्ठलाशी हितगूज करत बसायचे. त्या विठ्ठलाला पण रिकामा वेळ होता. त्यालाही काही काम नाही यालाही नाही. बसायचे बोलत तास न् तास. गोणाई-दामाशेटी आता थकले होते. आऊबाईचे लग्न आधीच झाले होते. आता नामदेवच लग्नाचा होता. तो काही कामधंदा करत नसे. मग मुलगी कोण देणार याला ? अशी काळजी त्याच्या आईवडिलांना लागून राहिली होती. घरी काही काम असले की देवळातून नामदेवाला बोलावून आणावे लागे. तेवढ्यापुरता नामदेव घरी येई. काम झाले की पुन्हा देवळात जात असे.

दामाशेटीकडे वारकरी उत्तरावयास येत. त्यातच लांब मराठवाड्याकडील एक नवरा-बायको मुलगीला घेऊन पंढरीस आले होते. ते दामाशेटींच्या घरात राहात होते. परत जाताना त्यांनी आपल्या लहान मुलीस दामाशेटीकडे 'तुम्ही हिला सांभाळा' असे म्हणून ठेवले आणि ते दोघे निघून गेले. ती लहान मुलगी म्हणजे जना. जना साधारण नामदेवाच्या बरोबरीची होती. त्यामुळे नामदेव-जना नेहमी कामकाजात एकत्र असत. दामाशेटी नामदेवास नेहमीच कामधंदा करण्याविषयी बजावत; पण नामदेव त्या गोष्टीकडे नेहमीच कानाडोळा करत असे. थोडेफार काम केले की तो कंटाळत असे. देवळात जाऊन विठ्ठलाला आपले गाऱ्हाणे सांगत असे. नामदेव रोज देवळात जाऊन बसतो, विठ्ठलाशी बोलत बसतो हे गोणाईला माहिती झाले. ती केव्हा केव्हा देवळात जाऊन त्या विठ्ठलाला रागावत असे. तुझ्यामुळे माझा मुलगा कामधंदा करत नाही. त्याला जरा कामधंदा करायला सांग असे ओरडत असे. तेव्हा विठ्ठल नामदेवाला म्हणे, 'नाम्या, तू काही घरचे काम का नाही करत ? तुझ्यामुळे मला रागवून घ्यावे लागते. तू इकडे येऊ नकोस. खरं तर इतर संत येतात, भेटतात; पण तू नाही आलास तर मला चैन पडत नाही. तुझ्यावर घरची जबाबदारी आहे ती तू पार पाड. राहिलेल्या वेळेत मला भेट.'

त्यावर नामदेव म्हणत, 'मला काम करायला आवडत नाही. रोज तेच तेच काय. मी सारखा येईन इथे. तुझ्याशी बोलेन. तुला मी नकोसा झालोय का ? तसे सांग. तर मग मी इकडे येणार नाही.' तेव्हा देव त्याला म्हणे, 'नको रे नाम्या असं बोलू. मला टाकून जाऊ नको.' तेव्हा दोघेही मनमुराद हसत. पुन्हा नव्याने बोलणी सुरू होत.

इकडे दामाशेटी-गोणाईने विचार करून नामदेवाचे लग्न केले. जबाबदारी अंगावर पडली की नामदेव सुधारेल असे त्यांना वाटले. नामदेवाच्या बायकोचे नाव राजाई; पण लग्न झाल्यामुळे नामदेवात म्हणावी तशी सुधारणा झाली नाही. मात्र घरात खाणारे एक तोंड वाढले. आता आपला नवरा केवळ विठ्ठल विठ्ठल करतो, कामधंदा काहीच करीत नाही हे राजाईच्या लक्षात आले होते. तिनेही त्यास बरेच वेळा सांगितले; पण ऐकणार तो नामदेव कुठला. निसर्गनियमानुसार नामदेवास

राजाईच्या पोटी नारा, म्हादा, गोंदा, विठा आणि निंबाई असे चार मुलगे आणि एक मुलगी झाली. त्याच्या संसाराचा व्याप वाढला; पण संसार चालविण्यास पैसा हवा असतो ना तो मात्र तेवढा पुरेसा मिळत नव्हता हे मात्र खरे.

एकदा दामाशेटींनी नामदेवास सांगितले, 'गणोबा नामक गृहस्थास मी उधार कपडे दिले आहेत. त्यास धोंडोबा जामीन आहे. ती उधारी वसूल करून आण. जा.' नामदेव गणोबाकडे गेला. त्याच्याकडे पैसे नव्हते. तेव्हा त्याच्याकडे धोंडा जामीन होता तो घेऊन नामदेव घरी आला. तेव्हा त्याचे आई-वडील घरी नव्हते. तेव्हा नामदेवाने तो धोंडा घरातील एका खोलीत कुलूप लावून ठेवला आणि तो देवळात गेला. दामाशेटी-गोणाई घरी आले तर राजाईने त्यांना धोंड्याबद्दल सांगितले. दामाशेटींनी नामदेवास घरी बोलावून घेतले आणि ते त्यास खूप रागावले. पैसे नाहीत तर मग हा दगड कशाला आणला आहेस ? हा कसला तुझा व्यवहार ? तेव्हा नामदेव त्या दगडास म्हणाले, 'अरे बाबा पैसा कोठे आहे ?' त्यांनी तो दगड अंगणात भिरकावला. आश्चर्य काय की तो दगड सोन्याचा झाला. बायकांना आनंद झाला. दामाशेटी त्यास म्हणाले, हा प्रकार तू कोणास सांगू नको. लोक हे सर्व घेऊन जातील. तेव्हा नामदेव त्यांना म्हणाले, यातून आपला जेवढा पैसा आहे तेवढा घ्या. बाकीचे गणोबास द्या; पण राजाई म्हणाली, कुणाला काही द्यायचे नाही. हे सर्व आपले आहे; पण नामदेव हट्टास पेटले. दोघांचे भांडण सुरू झाले नि बघता बघता ही बातमी गावभर झाली. लोक म्हणाले, तुमचे जेवढे पैसे आहेत तेवढे घ्या. तो धोंडा आम्हाला द्या. नाहीतर सरकार दरबारी आम्ही तक्रार करू. नामदेव म्हणाले, ठीक आहे. आमचे पैसे द्या. तो दगड घेऊन जावा. लोकांनी त्यांना पैसे दिले. तो सोन्याचा दगड लोक घेऊन गेले. लोकांनी तो दगड खाली ठेवला आणि क्षणातच त्या दगडातील सोनेपणा गेला आणि तो दगड पूर्ववत दगड झाला. लोक चिडले; पण आता ते यावर काही करू शकत नव्हते. राजाईची इच्छा पण तशीच राहिली.

आपल्या मुलाच्या कर्तृत्वाने निराश झालेले दामाशेटी, गोणाई वृद्धापकाळामुळे थकले होते. काळाच्या ओघात दोघेही देवाघरी गेले. आता राजाई नामदेवास बराच उपदेश करी; पण नामदेव तिला देवाच्या गोष्टी सांगून शांत करी. नामदेव नेहमी कडकडीत उपवास करी. बायको मुलांना; पण उपवास करायला लावे. एका दिवशी काहीही खायचे नाही की प्यायचे नाही. एकदम निर्जळी उपवास. द्वादशीदिवशी उपवास सोडायचा असे. त्यावेळी नामदेव घरी पाहुण्यांना जेवायला आणित असे. आधीच घरी गरिबी. त्यात घरात अन्न नसे. आलेला अतिथी उपाशी कसा ठेवणार. मग राजाई इकडून उधार-उसनवार करून स्वयंपाक करी. पाहुण्यांना वाढे. उरलं सुरलं घरात वाढत असे.

असेच एक दिवस राजाईचे भाऊ घरी पाहुणे आले. तेव्हा नामदेव देवळात गेले होते. नामदेव घरी आले ते या दोघांशी बोलले पण नाहीत. राजाई म्हणाली, 'ते ढोंगी वारकरी येतात त्यांच्यासाठी

आमच्या घरात अन्नछत्र असते आणि माझे भाऊ आलेत तर त्यांच्याशी तुम्ही बोलतही नाही. हे बरे नव्हे. यांना काही गोड करून वाढायला हवे. ते कालपासून उपाशी आहेत.'

तेव्हा नामदेव म्हणाले, 'आज दशमी, उद्या एकादशी हे दोन्ही दिवस उपवास आहेत. परवा द्वादशी आहे. तेव्हाच यांना जेवण मिळेल. ते दोघे घाबरले. दुसरे दिवशी नामदेव नित्यकर्मे आटोपून देवळात गेले. इकडे राजाई, मुले, तिचे भाऊ भुकेने तळमळत होते. असला नवरा म्हणून राजाई चिडली. घरात फराळाचे पण सामान नव्हते. एवढ्यात एक वाणी पाठीवर गोणी घेऊन आला. राजाईला म्हणाला, 'नामदेव घरात नाही काय ? ही गोणी येथे ठेवतो. यातील पैसे लागतील तर तुम्ही घ्या. मी संध्याकाळी न्यायला येईन.' तेवढ्यात नामदेव घरी आले. त्यांना हा प्रकार समजला. हे पैसे आपण वाटून टाकावेत म्हणून तो ब्राह्मणांना बोलवायला गेला. तेवढ्यात राजाईने त्यातील थोडे पैसे काढून लपवून ठेवले. नंतर नामदेवाने ते सर्व पैसे ब्राह्मणांना वाटून टाकले. राजाईने लपवून ठेवलेल्या पैशाचे कोळसे झाले होते. ते राजाईने नामदेवास दाखवले. नामदेवाची दृष्टी त्या कोळशावर पडली तर परत त्याचे पैसे झाले. तेही नामदेवाने वाटून टाकले. आपल्या पतीच्या अंगी हे सामर्थ्य पाहून राजाईने त्यास उपदेश करणे सोडून दिले.

एकदा विठ्ठल आणि नामदेव बोलत बसले होते. तेव्हा विठ्ठल त्यास म्हणाला, 'तू प्रपंच टाकून माझ्याकडे येतोस हे बरे नव्हे.'

तेव्हा नामदेव चिडले. ते म्हणाले, 'विठ्ठला मी तुला नकोसा झालोय. अरे, हा संसार मला खरोखरच आवडत नाही; पण मी तुला येथे आलेला आवडत नाही तर मी हे पंढरपूर सोडून जातो.' म्हणून नामदेव निघाला. तेव्हा विठ्ठलाने त्याला समजूत घालून परत आणले. नामदेव आता विठ्ठलावर अभंग रचू लागला. आपल्या गोड आवाजात म्हणू लागला. त्यामुळे साऱ्या संत परिवारात नामदेव लाडका झाला. त्याचे कीर्तन करण्याची पद्धत तर इतकी रसाळ होती की देऊळ सोडून पांडुरंग स्वत: त्या चंद्रभागेच्या वाळवंटात येऊन बसत असे. एकदा देवाचे आणि नाम्याचे जोराची वादावादी झाली. नामदेव रुसून घरी गेला. संध्याकाळी त्याचे कीर्तन होते. तो चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तनास उभा राहिला; पण देवाकडे पाठ करून. 'जय जय रामकृष्ण हरी गजर झाला. नामा कीर्तन करू लागला. त्याची रसाळ, ओघवती वाणी बोलू लागली. श्रोते अगदी तल्लीन झाले होते. आता मात्र विठ्ठलास राहवेना. बाहेर जावे तर नामदेव रागवणार. आता कसे करायचे. तर विठ्ठलाने देवळाचे तोंडच फिरवले. आता त्याला आत बसून नामदेव दिसू लागला. तेव्हा कुठे त्याच्या जिवात जीव आला. नामदेवानेही त्याला पाहिले. तो हसला. त्याच्याकडे बघून हसला. त्याच्याही जिवात जीव आला.

निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, नामदेव, चोखा मेळा, सोना न्हावी असे सगळे वारीनिमित्ताने पंढरीस येत. एकमेकांची भेट होई. इकडची,

तिकडची बोलणी होत. नवीन काही रचना केल्या असतील त्या एकमेकास ऐकवत. भजन, कीर्तन, नामस्मरण यात ते अगदी रंगून जात. भक्तीला नुसता महापूर येत असे. आपल्या नामभक्तीत, नाम संकीर्तनात विठ्ठलही अगदी पार बुडून जात असे. विठ्ठलनामाचा जयजयकार, त्याचे गुणवर्णन, त्याचे रूपवर्णन, त्याचे लाड, त्याचे कौतुक याला नुसते अगदी उधाण येत असे. अद्वैत परमतत्व एकमेकास उलगडून सांगत प्रत्येकजण अगदी आनंदून जात असे.

ज्ञानेश्वर नामदेव अगदी एकमेकांचे जवळचे होते. ज्ञानेश्वरादी भावंडांना आपेगावकरांनी वाळीत टाकले होते. त्यांना त्यातून बाहेर निघण्यासाठी नामदेवही त्यांना सर्वतोपरी मदत करत होते. असेच सर्वजण विठ्ठल भक्तीवर बोलत बसले होते. ज्ञानेश्वर सर्वात ज्येष्ठ असणाऱ्या संतांना गोरोबा काकांना म्हणाले, 'काका आमच्यापैकी कुणाची मडकी कच्ची आहेत, कुणाची पक्की आहेत, याची परीक्षा घ्या. गोरोबांनी हातातल्या थापटण्याने प्रत्येकाच्या कपाळावर हलकासा आघात केला. प्रत्येकजण शांत होता. मात्र नामदेव चिडले. हा प्रकार मला आवडला नाही. मी तुम्हा सर्वांपेक्षा देवाला जवळचा आहे, असं म्हणाले. तेव्हा गोरोबाकाका म्हणाले, ज्ञानेश्वरा हे मडकं कच्चं आहे. सगळे हसले. नामदेवाने विठ्ठलाकडे तक्रार केली. विठ्ठल त्यास म्हणाला, 'जो सद्‌गुरूस शरण गेला नाही तो कच्चाच होय. तू सद्‌गुरूंना शरण जा.' नामदेव म्हणाले, 'तू माझी तक्रार ऐकलीस; पण त्या संतांच्या बाजूने तू बोलतोस.' तेव्हा विठ्ठल त्याला म्हणाला, 'माझे अद्वैताचे खरे रहस्य काय आहे ते तुला कळेल. भक्त आणि ज्ञानी यात ज्ञानीच थोर होय. तेव्हा सद्‌गुरू करून घे. त्याआधी त्याची योग्यता जाण.' मग देवा मी कुणाला सद्‌गुरू म्हणून शरण जाऊ ते तूच मला सांग. तेव्हा देव म्हणाला, 'औंढ्या नागनाथास जा. तिथे विसोबा खेचर आहेत. त्यांना शरण जा.'

नामदेव उठला. औंढ्या नागनाथास गेला. तिथे शिवमंदिरात एक वृद्ध गृहस्थ शिवपिंडीवर पाय ठेवून झोपले होते. नामदेवाने ते दृश्य पाहिले. 'अरेरे हे काय ? इतकी घाण ? आणि या आपल्या गुरूची अशी अवस्था ?' नामदेव त्यांना म्हणाले, 'अहो महाराज जरा उठून तरी बसा. पायाखाली तुमच्या शिवलिंग आहे.' तेव्हा विसोबा म्हणाले, 'अरे मी गलितगात्र आहे. तूच माझे पाय जिथे देव नाही तिथे ठेव.' तेव्हा नामदेवाने त्यांचे पाय उचलले आणि दुसरीकडे ठेवले. तर तिथे पायाखाली शिवलिंग. तिसरे, चौथीकडे तोच, तोच प्रकार. जिथे पाय ठेवावेत तिथे देव. मग नामदेवांना गुरूची ओळख पटली. तो त्यांना शरण गेला. विसोबांनी आपली माया आवरती घेतली कारण त्यांनी मुद्दामच नामदेवाची परीक्षा घेतली होती. मूळ स्वरूपात ते आले. त्यांनी नामदेवास अध्यात्माचा उपदेश दिला. त्यांच्या सहवासात काही काळ राहून नामदेव पंढरपुरास आला. नामदेव खरोखरच ज्ञानी झाला काय हे पाहण्यासाठी देवाने त्याची परीक्षा घेतली. एकदा नामदेव जेवायला बसले होते. तेव्हा एका कुत्र्याने त्यांच्या ताटातली

भाकरी पळवली; पण आता नामदेव चिडले नाहीत. त्यांनी ओळखले कुत्रा जरी असला तरी तो देव आहे. म्हणून त्यांनी हातात तुपाचे भांडे घेतले आणि ते त्या कुत्र्यामागे पळत सुटले आणि म्हणाले, 'देवा थांब कोरडी भाकरी खाऊ नको. हे घे तूप लाव त्याला.' देवाची आता खात्री पटली. ते कुत्रे गुप्त झाले.

एकदा पंढरपुरातील दादा सावकाराकडून नामदेवाने काही कामधंदा करण्यासाठी दोन हजार रुपये कर्ज घेतले. तो दादा सावकार फार म्हणजे फारच कंजूष होता. जास्त व्याज घेऊन तो कर्ज देत असे; पण नामदेवास त्याने फार व्याज लावले नाही. नामदेवाने कर्जाऊ रक्कम घेतली आणि तो व्यापार करतो म्हणून दुसऱ्या गावी गेला. कामधंदा म्हणजे काय करावे ? तर ब्राह्मणभोजन घालून दक्षिणा द्यावी असे त्याने ठरविले. गोदातीरी त्याने ब्राह्मणभोजन घालण्यास सुरुवात केली. रोज या ब्राह्मण भोजनाची वार्ता सर्वत्र पसरली. तसे रोज जास्त जास्त ब्राह्मण भोजनास येऊ लागले. या गावातून त्या गावात असे करत करत ती बातमी पंढरपुरास दादा सावकारास समजली. त्याला वाटले आपले पैसे बुडाले. तो धावत जेथे नामदेव होता तेथे भराभर प्रवास करीत गेला आणि ब्राह्मण जेवत असताना नामदेवास पैसे मागू लागला. आता नामदेवाकडे पैसे नव्हतेच. मग तो देणार कुठून ? मग त्याने विठ्ठलाचा धावा केला. देव त्याला म्हणाला, 'युक्तीने तू दादा सावकाराला खोल पाण्यात आण. मग मी बघतो.' गोड बोलून नामदेवाने दादाला खोल पाण्यात नेले. दादा घाबरला. त्याने पाण्यात बुडी मारली. नामदेव दिसेना. मात्र खोल पाण्यात त्याला ब्राह्मण जेवायला बसले असून तिथे यवन राजा होता. त्याने दादाला जेवायला बोलावले. तर दादा त्यास म्हणाला, मी इथे जेवत नाही, कोरडा शिधा द्या. त्याने कोरडा शिधा मिळाला तो धोतरात बांधला. अशावेळी त्याला भीती वाटायला लागली. त्याला वाटले नामदेवाने मला सोडवले तर मी त्याचे कर्ज माफ करीन. तेवढ्यात त्याला पाण्यात बाजूला नामदेव दिसले. पुन्हा त्याने पाण्यात डुबकी घेतली. पुन्हा तो वर आला पाहतो तो काय तो पंढरपुरात होता आणि चंद्रभागेत. त्याला काही कळेना. तो पाण्याबाहेर आला. धोतरात बांधलेला कोरडा शिधा, ते शिजवण्यासाठी दिलेल्या गोवऱ्या त्याने तिथेच वाळवंटात टाकून दिले. तो घरी पळत गेला. घरचे म्हणाले मिळाले पैसे ? हा म्हणाला जीव वाचला, बास झाले. कपडे बदलताना धोतरात काही जड लागले तर एक गोवरी राहिली होती. ती त्याने बाहेर काढली तर ती सोन्याची होती. अरेरे ! बाकीच्या गोवऱ्या आपण टाकून दिल्या; पण शेवटी जेवढे नशिबात तेवढेच मिळणार असा विचार करून तो गप्प बसला.

मुलांनो नामदेवासंबंधी एक आणखी गोष्ट तुम्हाला सांगायची आहे ती आता सांगते हं ! नामदेवांना मी विठ्ठलाचा खूप लाडका आहे, देवाचा फार जवळचा आहे याचा त्यांना अहंकार होता. इतरांना ते फारशी किंमत देत नसत. एकदा ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपानदेव,

मुक्ता हे सर्वजण पंढरपूरला आले असता पंढरीनाथाच्या दर्शनाला देवळात आले. तेथे नामदेव बसले होते विठोबाशी बोलत. ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपानदेव यांनी विठ्ठलाला नमस्कार केला आणि नामदेवासही केला. मात्र मुक्ताने नामदेवास नमस्कार केला नाही आणि नामदेवानेही त्यांना प्रतिनमस्कार केला नाही. मुक्ताने नमस्कार मला का केला नाही असे नामदेवाने विचारले, मी मोठा आहे. देवाच्या जवळचा आहे, मग असे का ? तेव्हा मुक्ता म्हणाली, 'तू देवाच्या जवळ राहतोस; पण तुझा अहंकार गेला नाही. सर्वजण तुझ्या पायावर डोके ठेवतात ते ठेवू देत; पण तुझा अहंकार पूर्णपणे गेल्याशिवाय मी तुला नमस्कार करणार नाही.' असे रोखठोक उत्तर मुक्ताने नामदेवास दिले. तेव्हा नामदेवाने देवाकडे तक्रार केली. तेव्हा देव त्याला म्हणाला, 'तू सद्‌गुरू करून घे. तरच तुला माझ्या स्वरूपाची ओळख होईल. इतर संतांची योग्यता तेवढीच थोर आहे याबाबत तुला कळेल.' तेव्हा देवाने त्याला सांगितल्यावर पटले की मी अपूर्ण ज्ञानी आहे. सद्‌गुरू केला पाहिजे.

अशीच आणखी एक दुसरी गमतीशीर गोष्ट आहे. ती पण आता तुम्हाला सांगणार आहे. नामदेवांना वाटत होते की, मी विठ्ठलाचा अत्यंत प्रिय सखा आहे. त्याचा मला रोज सहवास असतो आणि इतर संतांना मात्र तो केव्हातरीच भेटतो. तेव्हा मीच त्या सर्वात अधिकाराने मोठा आहे. मला गुरू करण्याची आवश्यकताच नाही आणि देव त्याला म्हणत असे, 'अरे माझे खरे रूप समजायला हवे तर गुरू कर' पण नामदेव ऐकेना. नामदेव त्यास म्हणाला, 'मी तुला चांगला ओळखतो. मग परीक्षा घे एकदा माझी. देव म्हणाला, 'ठीक आहे तू आणि सावता तिकडे बनात जाऊन बसा.' देवाच्या सांगण्याप्रमाणे सावता माळी आणि नामदेव बनात जाऊन बसले. नामदेव, सावता देवाची वाट बघू लागले. आता देवाने पठाणाचा वेष घेतला. हातात ढाल, तलवार, बंदूक, भाला, सुरा अशी शस्त्रे घेऊन तो घोड्यावर बसून मोठमोठ्याने ओरडत 'नामा दर्जीको पकडो' म्हणत त्या दोघांजवळ आला. हा उग्र हत्यारबंद पठाण बघून नामदेव घाबरले. ते सावत्यास म्हणाले, 'अरे पळ, चल. हा पठाण आपल्याला पकडेल आणि आपणास कोंडून घालेल. आपल्याला कामास जुंपेल. चल पळ.' पण सावंता म्हणाले, 'मी बाबा वृद्ध आहे. मला नाही पळता येत. तुला पळून जायचे तर बेलाशक पळून जा.'

तेव्हा घाबरून नामदेव पळत सुटले. थोडे अंतर गेल्यावर मागे वळून पाहिले तर त्या पठाणाने आपल्या हातातला सुरा सावत्याच्या हातात दिला होता. ते बघून नामदेव इतके घाबरून गेले की त्यांनी जोरात पळत जाऊन देऊळ गाठले. देवाला सारे काही सांगितले. तेवढ्यात सावता तेथे आले. नामदेवाने त्यास विचारले, 'पठाण कोठे गेला ?' तेव्हा सावता त्यास म्हणाले, 'तो पठाण नव्हता देवच होता.' आता आपण देवाला ओळखायला चुकलो